# जिल्हा पोलिस भरतीतील वाहनचालक पदासाठी रविवारी लेखी परीक्षा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ जिल्हा पोलिस भरतीत चालक या पदासाठी रविवारी २६ मार्च रोजी लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

जिल्हा पोलिस दलातील पोलिस शिपाई चालक पदाच्या भरतीसाठी लेखी परीक्षा २६ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपूरी नांदेड येथील इन्डोअर हॉल येथे घेण्यात येणार आहे. या परिक्षेसाठी उमेदवार परीक्षा केंद्रावर सकाळी ६.३० वाजता 'रिपोर्ट' करतील. विलंबाने हजर होणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

जिल्हा पोलिस भरतीतील चालक या पदासाठी प्रवेशपत्र प्राप्त न झालेल्या उमेदवारांनी नियंत्रण कक्ष, पोलिस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.